**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १३ अ

माझ्या मित्रांनो, मी तुम्हाला सांगू इच्छितो की आपण सन २००२ चे संवाद पूर्ण केले आहेत. आणि २००१ चे संवाद सुरू करीत आहोत. आज आपण मे २००१ मध्ये प्रशांती निलयमच्या व्हरांड्यात भगवान बाबांनी विद्यार्थ्यांबरोबर केलेले संभाषण ऐकणार आहोत. बाबांचे संवाद ऐकण्यामध्ये तुम्ही जी उत्सुकता दाखवलीत त्याबद्दल मी आभारी आहे.

**'जर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर तुम्ही सर्व त्रासांपासून मुक्त व्हाल.'**

भगवानांनी जे विधान केले ते आपल्या सर्वांसाठी खूपच मोलाचे आहे. ते खालीलप्रमाणे म्हणाले :

''तुम्ही माझ्या शब्दांप्रमाणे वागाल, जर माझी आज्ञा पाळाल तर तुम्ही सर्व त्रासांपासून मुक्त व्हाल. सर्व प्रश्नांतून तुमची सुटका होईल.''

आणि त्यांचे दुसरे विधान होते, ''परमेश्वर हा लोहचुंबकासारखा आहे आणि त्या चुंबकीय आकर्षणाने तो प्रत्येकाला त्याच्याकडे आकर्षित करून घेतो. त्या चुंबकात कोणतीही चूक नसते, ते चुंबक बिनचूक असतं आणि प्रत्येकाला ते आकर्षित करतं.''

ठीक आहे! भगवानांनी केलेली विधाने मला स्पष्ट करू द्या. रामायणामध्ये हनुमान नावाचे फार महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे. हनुमान रामाच्या आज्ञा काटेकोरपणे पाळत असे म्हणून तो अधिकाराचे स्थान मिळवू शकला.

परमेश्वराच्या आज्ञा पाळल्याने तुम्ही समाजाकडून उच्च स्थान मिळवण्यास योग्य ठराल. समाज तुमच्याकडे एक आदर्श आणि विशेष व्यक्तिमत्त्व म्हणून पाहील. मी तुम्हाला असंही सांगू शकतो की, महाभारतात पांडवांनी श्रीकृष्णाच्या आज्ञा अगदी दृढ श्रद्धेने पाळल्या म्हणूनच ते गौरवपात्र ठरले. अंतिम विजय त्यांनीच मिळवला आणि आजपर्यंत प्रत्येकाकडून त्यांना बहुमान मिळत आहे.

**'जर तुम्ही परमेश्वराच्या पाऊलवाटेवरून चालत राहाल, तर तुम्ही त्याच्यापर्यंत पोहोचाल.'**

भगवान बाबांनी त्यांच्या एका प्रवचनात सांगितलेली मोठ्यांची छोटीशी आणि साधी गोष्ट मला तुम्हाला सांगायची आहे. तुम्ही भगवान कृष्णाविषयी खूपसे ऐकले असेलच. लहान असताना नेहमी शेजाऱ्यांकडे जाऊन दही-दूध चोरून खाण्याची त्याला सवय होती. ज्यांनी भागवत वाचलं असेल, त्यांना हे समजेलच, हा काही खरोखर चोरी करण्याचा प्रश्न नाही. या कृतीमागे विशेष लपलेला अर्थ आहे. गोष्टीत असं लिहिलं आहे की भगवान कृष्ण शेजाऱ्यांकडे जायचा आणि कोणाचेही लक्ष नसताना दूध प्यायचा. लोणी खायचा असं.

ह्या बाबतीत लोणी म्हणजे माणसाचं हृदय, दूध म्हणजे भक्ती आणि शरीर हे भांडं आहे. चोरीची कृती म्हणजे कुणाच्याही नकळत माणसाचं मन जिंकणं, हा असा गर्भितार्थ आहे.

एक दिवस कृष्णाने दूध प्यायला सुरुवात केली. तो दूध कसा पीत होता? त्याने खालच्या घड्याच्या काठावर पाय ठेवले आणि वरच्या घड्यातील दूध तो पिऊ लागला. त्याने वरचा घडा जरा तिरपा केला आणि त्याची वरची बाजू खाली केली आणि दोन्ही पावलं दुधाने भरलेल्या घड्याच्या काठावर ठेवून तो दूध पिऊ लागला.

माता यशोदा कृष्णाला शोधायला बाहेर पडली आणि शेवटी तिला तो सापडला. कृष्णाने ताबडतोब उडी मारली आणि तो पळू लागला. माता यशोदेला तो कुठेच सापडेना. सरतेशेवटी कृष्णाच्या पावलाचे ठसे तिला

दिसले. कारण ते दुधाने माखले होते. (हशा) अशा रीतीने दुधाने भरलेल्या त्या पाऊलखुणांवरून माता यशोदेला त्याचा शोध घेता आला.

महाभागवतामधील ही कथा असं दाखवते की जर तुम्ही परमात्म्याच्या पाऊलखुणांना अनुसराल तर तुम्ही त्याच्यापर्यंत जाऊन पोहोचाल. कृष्ण अथवा भगवंताच्या पावलाच्या ठशावरून त्याची माता– एक भक्त– त्याला शोधू शकली, त्याचप्रमाणे आपण, भक्तांनी, त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी त्याच्या पाऊलखुणांना अनुसरले पाहिजे. हाच मतितार्थ भगवान बाबांनी निवेदित केलेला आहे.

## 'परमेश्वर म्हणजे लोहचुंबक आहे.'

आता इथे आणखी एक गोष्ट आहे. आपल्यापैकी काहींना असं वाटत असेल की बाबांनी आपली निवड केली नाही, किंवा बाबांनी आपल्याला त्यांच्या सान्निध्यात घेतलं नाही. आपल्याला तसं वाटणं साहजिक आहे. पण ती आपली चूक असते. का? परमेश्वर हा लोहचुंबक आहे आणि आपण लोखंडाचे तुकडे आहोत. लोहचुंबकात काहीही चूक नसते. पण लोखंडाचे तुकडे जर धुळीने आणि गंजामुळे माखलेले असतील, तर लोहचुंबकाकडे आकर्षित होत नाहीत. तेव्हा चुकही लोखंडातच असते. ती लोहचुंबकात नसते. म्हणून लोहचुंबकाकडून आकर्षित होण्यासाठी लोखंड स्वच्छ, शुद्ध असावं लागतं.

म्हणजे परमेश्वर हा लोहचुंबक असतो आणि भक्त हा लोखंड असतो. लोखंडाने म्हणजे भक्ताने बंधनांच्या धुळीपासून आणि अहंभावाच्या गंजापासून दूर असलं पाहिजे. ह्या दोन्ही गोष्टींचा अभाव असेल तरच लोहचुंबक आपोआपच लोखंडाला जवळ ओढून घेते, असं भगवानांनी सांगितलं आहे.

## 'अध्यात्माच्या मार्गावर कोणतेही अडथळे नसतात.'

तिथलं वातावरण आणि भगवानांची प्रसन्न मन:स्थिती पाहता मी त्यांना एक प्रश्न विचारण्याचं धाडस केलं.

''भगवान, आपल्याला अध्यात्माच्या मार्गावर एवढे अडथळे का येतात? आपल्या आध्यात्मिक जीवनात असे अडथळे किंवा समस्या का असतात? का, भगवान?''

स्वामींनी सरळ उत्तर दिलं.

''अध्यात्मिक मार्गावर अडथळे मुळीच नसतात. तो तुमचा दुबळेपणा आणि श्रद्धेचा अभाव असतो, जो सगळ्या अडथळ्यांना जबाबदार असतो. खरं म्हणजे आध्यात्मिक मार्ग सरळ, साधा आणि अडथळ्यांशिवायच असतो.''

भगवान म्हणाले की, ''आध्यात्मिक मार्गातील अडथळ्यांना दोन कारणे आहेत. ती कोणती? पहिलं कारण म्हणजे श्रद्धेचा अभाव. दुसरं म्हणजे, पूर्व जीवनातील घटनांचे परिणाम आणि त्याची प्रतिक्रिया हे आहे. हे दोन घटक आध्यात्मिक मार्गावरून चालण्यास अडथळे आणतात.

'जिथे दृढ श्रद्धा असेल, तिथे तुम्ही कुठल्याही समस्येला तोंड देऊ शकाल.'

आणि मग भगवानांनी आपल्या सर्वांसाठी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला : आपल्याला असं वाटतं की आपण आध्यात्मिक मार्गावर आहोत, पण स्पष्ट सांगायचं तर ते तसं नसतं. का?

कारण आपलं ध्येय हे भौतिक, ऐहिक आणि देहविषयक असतं.

एक साधं उदाहरण देतो: मला परीक्षेत उत्तीर्ण व्हायचं आहे. म्हणून मी मंदिरात जातो, नारळ फोडतो आणि देवाला काही अर्पण करण्याचा नवस करतो. ही भक्ती आहे का? नाही! माझं मंदिरात जाणं हे केवळ परीक्षेत पास होण्यासाठीच असतं. हे भौतिक सुख असतं. त्याचं कारण हे भौतिक फायदा आणि स्वार्थ यासाठीच असतं.

ह्याला खऱ्या अर्थाने भक्ती म्हणता येणार नाही.

म्हणून बाबा सांगतात : ‘‘तुम्ही कोणतंही काम स्वार्थाकरता आणि स्वत:च्या फायद्यासाठी करता, ती आध्यात्मिक भक्ती नसते.’’

म्हणजेच आध्यात्मिक मार्गात कुठल्याही शर्तीशिवाय असलेले ईश्वरावरचे प्रेम, ऐहिक फायदा किंवा भौतिक गोष्ट मिळविण्यासाठी नसलेल्या प्रेमाची अपेक्षा असते. आता, तुम्हाला पौराणिक ग्रंथांमध्ये दोन निरनिराळ्या वृत्तींची माणसे सापडतील. पहिला म्हणजे देव किंवा देवदूत. दुसरा म्हणजे राक्षस किंवा पिशाच्च. देव किंवा देवदूत यांची भक्ती पूर्णत: धार्मिक आणि नि:स्वार्थी होती. त्यामुळे ते पूजनीय होते. तथापि पिशाच्च लोक वर्षानुवर्षे तपश्चर्या करत आणि धार्मिक कृत्य आचरीत, तरीसुद्धा ते धिक्कारले जात कारण त्याचे साध्य हे भौतिक होते आणि ते साध्य हे स्वार्थातून निर्माण झालेले असे. ते पूर्णत: अहंभावी होते, आणि म्हणून भगवान म्हणतात, ‘‘तुमची भक्ती ही नि:स्वार्थी असली पाहिजे.’’

नंतर स्वामींनी आणखी एक दुसरे विधान केले, जे आपल्या सर्वांसाठी उत्तेजन देणारे आहे.– ‘‘जर तुमचा विश्वास दृढ असेल आणि तो विश्वास तुम्ही अधिकाधिक बळकट कराल तर तुम्ही तुमच्या मार्गातील असंख्य अडथळ्यांवर मात करण्यास समर्थ व्हाल.’’

आपल्या सर्वांसाठी हे सत्य आहे. मला असं वाटत नाही की आपण इथे खूप सुखात आहोत. मला असं वाटत नाही. आपण आपल्या परमेश्वरावरील दृढ श्रद्धेमुळे आपल्या सर्व समस्यांवर आणि अडथळ्यावर मात करू शकू. म्हणजेच जिथे दृढ विश्वास आहे, तेथे तुम्हाला कधीही भीती वाटणार नाही. तुम्ही कोणत्याही प्रश्नाला तोंड देऊ शकाल असं भगवान म्हणाले.

## ‘‘अध्यात्मामध्ये वेगवेगळे स्तर नसतात.’’

मग मी म्हटलं, ‘‘भगवान, प्रश्न विचारल्याबद्दल क्षमा करावी. मला कसं कळेल की मी आता उच्च स्थानी पोचलो आहे? अध्यात्मातील एका उच्च स्थानावर पोचलो आहे?’’

ताबडतोब उत्तर आले. ‘‘अध्यात्मावर निरनिराळ्या पातळ्या नसतात. काही उंच नसतं, काही खाली नसतं. अध्यात्मात सर्वजण समानच असतात.’’

पुढे त्यांनी स्पष्ट केलं, ‘‘एक जातींची पद्धत असते आणि दुसरी राहणीमानाची पद्धत असते. वर्गपद्धती, जातीपद्धती– कोणाकडे आहे, कोणाकडे नाही, श्रीमंत आणि गरीब– अशा सर्व प्रकारच्या पातळ्या जगात आहेत. अशा समाजातील निरनिराळ्या पातळ्या आहेत. तथापि, अध्यात्मात अशा पातळ्या, असे स्तर नाहीत. तिथे उच्च स्थाने नाहीत. सर्वजण बरोबरीचे असतात. कारण परमेश्वर हा एकच एक असतो, त्यात द्वैत नसते. त्यामुळे एक दुसऱ्यापेक्षा उच्च असण्याचा प्रश्नच येत नाही.’’

## ‘‘आम्ही तुमचे अनुकरण का करत नाही?’’

‘‘स्वामी, मी माझी मर्यादा ओलांडत आहे हे मला कळत आहे. पण कृपया मला माफ करावे. मला एक शंका आहे. आम्हा सर्वांना माहीत आहे की तुम्ही परमेश्वरच आहात, पण मग आम्ही तुमचे अनुकरण करण्यास का असमर्थ आहोत?’’

असे हे प्रश्न विचारण्यास धाडस असावं लागतं. (हशा) आणि अशा प्रश्नांना सहन करण्यासाठी खूप कृपा आणि दया असावी लागते. हे खरोखर धोक्याचेच आहे.

ह्याला बाबांनी जे उत्तर दिलं ते असं– ‘‘असं पहा, घरात आई स्वैपाक करते. ती निरनिराळे पदार्थ करते,

सर्व गोड पदार्थ, सर्व चवदार पदार्थ बनवते, पण मुलाला मात्र हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये जाऊन खायचे असते. (हशा) त्याला ते पदार्थ हॉटेलमध्ये जाऊनच खायचे असतात. त्याला घरी आईने बनवलेले पदार्थ खायचेच नसतात, हे दुर्दैव आहे. त्याप्रमाणे जरी इथे प्रेम देणारा परमेश्वर इथेच असतो, तरी तो तुम्हाला कळत नाही, समजत नाही.''

त्यानंतर त्यांनी आणखी एक विधान केले,

''आई एका मुलाला गोड पदार्थ देत नाही, पण दुसऱ्या मुलाला मात्र सर्व गोड पदार्थ देते. ज्या मुलाला ते गोड पदार्थ मिळत नाहीत, त्याने वाईट वाटून घेऊ नये. आईने त्याला गोड पदार्थ दिलेले नसतात कारण तो मधुमेही असतो. त्याने गोड पदार्थ खायला नकोत. म्हणून ती त्याला ते पदार्थ देत नाही. त्याचप्रमाणे परमेश्वर काही लोकांच्या इच्छा पूर्ण करतो, इतरांच्या इच्छा पुऱ्या करत नाही. का? कारण ते त्यांच्या हिताचंच असतं. आपल्यासाठी सर्वोत्तम काय आहे हे त्याला माहीत असतं.''

नंतर बाबा म्हणाले, ''काही लोकांच्या इच्छा किंवा मागण्या मी पुऱ्या करत नाही, कारण त्यांना माझ्या अशा वागण्याचा अर्थ समजत नाही.''

## ''स्वामी, होस्टेलवर या.''

मुलांनी एकदम आवाज उंचावून भगवानांना आर्जव करण्यास सुरूवात केली. ''स्वामी, होस्टेलवर या, स्वामी होस्टेलवर या.'' असं सर्वजण ओरडत होते.

स्वामी म्हणाले, ''ठीक आहे, ''मुलांनो, मला तुम्ही भावा-भावांसारखं राहिलेले हवे आहात. तुमच्यामध्ये एकोपा असला पाहिजे, एकत्र राहा. एकत्र शिका आणि बंधुत्वाने, प्रेमाने मोठे व्हा. हे फार फार महत्त्वाचे आहे.''

स्वामी पुढे म्हणाले, ''हिंदुस्थानने स्वातंत्र्य मिळवलं, पण आजपर्यंत त्यानं ऐक्य मिळवलं नाही. अजूनही ऐक्य नाही. म्हणून एकता ही फार महत्त्वाची आहे.''

नंतर त्यांनी एक उदाहरण दिलं.

''दोरे हे दोन बोटांमध्ये कापता येतात, पण कापड बोटांनी कापता येत नाही. का? दोरे एकत्र करून कापड विणले जाते. जेव्हा ते कापड बनते, तेव्हा ते बळकट होते, तुम्ही ते सहज कापू शकत नाही. ते जेव्हा वेगवेगळे धागे असतात, तेव्हा ते कापणे सोपे असते. तसंच जेव्हा तुम्ही एकत्रित उभे असता, तेव्हा कुणीही तुम्हाला हरवू शकत नाही, कुणीही तुमच्यावर हल्ला करू शकत नाही. ऐक्य हे फार महत्त्वाचे असते.

पुढे भगवानांनी तीन शब्द वापरले. एक होता 'रख्ती', ज्याचा अर्थ परिपूर्ती, दुसरा होता 'भक्ती' आणि तिसरा 'मुक्ती' म्हणजेच स्वातंत्र्य. म्हणून जेव्हा जिथे ऐक्य असते तेव्हा तिथे पूर्णत्व असते. ऐक्य म्हणजे भक्ती आणि ऐक्य 'मुक्ती'च्या मार्गाकडे म्हणजे स्वातंत्र्याकडे नेते.

नंतर भगवान होस्टेलवर गेले. तिथे त्यांनी काही वेळ व्यतीत केला आणि अशा प्रकारे विद्यार्थ्यांना आनंद दिला.

## 'इच्छा आणि आदर्श'

दुसऱ्या दिवशी स्वामी, २००१ मध्ये गुजराथ राज्यात झालेल्या भूकंपाविषयी बोलले. तिथे प्रचंड प्रमाणात जीवितहानी आणि वित्तहानी झाली होती. स्वामींनी ह्या भूकंपाबद्दल विचार मांडले.

ही नैसर्गिक संकटे आहेत. ती अशी का येतात? स्वामींनी सर्व भक्तांना समजण्यासाठी एक सुंदर उत्तर दिले.

एक गोष्ट स्वामींनी सांगितली, ती म्हणजे, ''जर तुमच्या जाणिवांचे तुम्ही गुलाम असाल, तर तुम्ही सर्व जगाचे गुलाम व्हाल. जर तुम्ही जाणिवांना जिंकलात तर जगातील प्रत्येक व्यक्ती तुमची गुलाम होईल. म्हणून तुम्ही तुमच्या जाणिवांचे राजे व्हा, नियंत्रक व्हा. तुम्ही तुमच्या जाणिवांचे कधीही गुलाम होऊ नका. नकोच!''

मग मी विचारलं, ''स्वामी, आशा किंवा इच्छा आणि आशय म्हणजे आदर्श या दोहोत काय फरक आहे?''

(आपण जर त्याना विचारण्याची संधी घेतली नाही, तर ती संधी परत कधीही मिळणार नाही. मला याची खात्री आहे की आता गमावलेली संधी ती कायमचीच गमावली जाते. म्हणून आपण प्रत्येक संधी पकडलीच पाहिजे.)

तर तो प्रश्न होता, ''स्वामी, इच्छा आणि आदर्श यातील फरक सांगाल का?''

भगवान म्हणाले, ''आशा, इच्छा वैयक्तिक असते. आशया-आदर्श हे मूलभूत असतात. आपण हे मूलभूत आदर्श विसरलो आहोत, पण आपण आपल्या व्यक्तिगत इच्छा अपेक्षा सांभाळत असतो. असे करण्याने तुम्ही तुम्हाला बिघडवत आहात.''

***